सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन
# उच्च व तंत्रशिक्षण विभाग



नरेंद्र मोदी
मा. पंतप्रधान



देवेंद्र फडणवीस
मा. मुख्यमंत्री



विनोद तावडे
मा. मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण



रवींद्र वायकर
मा. राज्यमंत्री, उच्च व तंत्रशिक्षण

## ➢ राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना :-

- मान्यता प्राप्त संस्थांमध्ये पात्र व्यावसायिक अभ्यासक्रमात प्रवेश घेणारे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थी केवळ निधी अभावी व्यावसायिक अभ्यासक्रमांपासुन वंचित राहू नयेत म्हणून एक सामाजिक बांधिलकी व घटनात्मक उत्तरदायित्व म्हणून महाराष्ट्र शासनाचा धोरणात्मक निर्णय.
- शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, दि. १३ ऑक्टोबर, २०१६ अन्वये मान्यता प्राप्त व्यावसायिक व उच्च शिक्षण अभ्यासक्रमात शिकणाऱ्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना राज्य शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेंतर्गत ज्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न रुपये ६.०० लाखापर्यंत आहे अशा विद्यार्थ्यांनी व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेतून प्रवेश घेतल्यास त्यांना शैक्षणिक शुल्काच्या ५० टक्के शिष्यवृत्ती म्हणून अदा करण्यात येईल.
- विद्यार्थ्यांना सदरची शिष्यवृत्ती ही सुलभ पध्दतीने व तात्काळ अदा करता यावी, याकरिता शैक्षणिक वर्ष २०१७ - १८ पासुन ही रक्कम विद्यार्थ्यांच्या आधार संलग्नित बँक खात्यामध्ये जमा करण्यात येईल.

- पालकांचे वार्षिक उत्पन्न मर्यादा :-

  अ) रु.२.५० लाख व त्यापेक्षा कमी वार्षिक उत्पन्न आहे अशा विद्यार्थ्यांसाठी पात्रता परीक्षेतील (दहावी /बारावी/पदविका) गुणांच्या टक्कयांची अट लागू नाही .

  ब) रु.२.५० लाखापेक्षा अधिक ते रु. ६.०० लाखा पर्यंत वार्षिक उत्पन्न आहे अशा विद्यार्थ्यांसाठी पात्रता परीक्षेतील (दहावी / बारावी ) गुण ६० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त असणे आवश्यक.

  - थेट व्दितीय वर्षात निवडक पदवी अभ्यासक्रमांसाठी पदविका अभ्यासक्रमाच्या शेवटच्या वर्षाच्या परीक्षेत एकुण गुण ५० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त असणे आवश्यक.
  - दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी गुणांच्या टक्क्यांची अट लागू नाही.

## ➢ डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना :-

- दि. १३ ऑक्टोबर, २०१६ च्या शासन निर्णयाद्वारे डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पासून सुरु करण्यात आली असून, राज्यातील अल्पभूधारक शेतकरी व नोंदणीकृत मजूर यांच्या महानगरातील संस्थांमध्ये शिक्षण घेणाऱ्या पाल्यांना, प्रतिवर्ष रु. ३०,०००/- व इतर ठिकाणी शिक्षण घेणाऱ्या पाल्यांना, प्रतिवर्ष रु.२०,०००/- इतका वसतिगृह निर्वाह भत्ता सुलभ पध्दतीने तात्काळ उपलब्ध करुन देण्यासाठी आधार संलग्नित बँक खात्यामध्ये जमा करण्यात येईल.

(वरील दोन्ही योजनांचा लाभ हा कुटुंबातील केवळ दोन अपत्यांपर्यंत मर्यादित राहिल)

❖ टिप :- वरील योजनांचे ऑनलाईन अर्ज राज्यस्तरीय डिबीटी पोर्टल वर भरावयाचे आहेत. पात्रतेचे निकष तंत्र शिक्षण संचालनालयाचे संकेत स्थळ-www.dtemaharashtra.gov.in वर उपलब्ध आहेत.